# पर्यटनात इतिहासाचे उपयोजन

**प्रा.डॉ.व्ही.आर.पाटील** कला,वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,कोवाड ता.चंदगड, जि.कोल्हापूर

E-mail vishnurpatil@gmail.com M.7796173321

---

**प्रस्तावना**

प्राचीन काळापासून प्रवास हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग आहे. मानव प्राचीन काळापासून वेगवेगळ्या कारणांनी प्रवास करत आहे. नव-नवीन स्थळांचा, प्रदेशांचा, चमत्कारिक वस्तूंचा शोध घेणे इ. कारणाने मानव प्रवास करत असे. यानंतर पर्यटनाचे थोडेसे स्वरूप बदलले. पर्यावरणातील बदल अनुभवणे व् धार्मिक दृष्ट्या पवित्र स्थळांना भेटी देणे अशा कारणांनी पर्यटन होऊ लागले. आधुनिक काळातील दैनंदिन स्पर्धात्मक जीवनातून चार दिवस आरामात घालवणे असे पर्यटनाचे सध्याचे स्वरूप पहावयास मिळते. पर्यटन आणि पर्यटक या दोन्ही भिन्न संकल्पना असल्या तरी त्या एकमेकांना पूरक आहेत. पर्यटन हे ऐतिहासिक सांस्कृतिक, सामाजिक ,धार्मिक व् भौगोलिक घटकांवर अवलंबून असते.आधुनिक काळात पर्यटन हा झपाट्याने विकसित होणारा एक सेवा उद्योग म्हणून पुढे येत आहे. पर्यटनामधून खूप मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होत असते. सुशिक्षित- अशिक्षित, कुशल-अकुशल, ग्रामीण – शहरी भागातील लोकांना रोजगाराची उपलब्धता या उद्योगातून होते.त्यामुळे लोकांचे जीवन उंचावणारा व्यवसाय म्हणून सामाजिक विकासात महत्वाचे योगदान आहे. दळणवळणामध्ये झालेल्या सुधारणा, सागरी व हवाई वाहतुकीत झालेल्या सुधारणामुळे आंतरराष्ट्रीय पर्यटनाला चालना मिळाली. अलीकडे केवळ मनोरंजन हा पर्यटनाचा हेतू न राहता ज्ञान संपादन करण्याच्या हेतून पर्यटन केले जात आहे. जगातील विकसित देशाच्या बरोबरीने भारतातील पर्यटन व्यवसाय सुद्धा विकसित होत आहे. भारताचा समृद्ध सांस्कृतिक वारसा हा भारतीय पर्यटनाचा खरा आधार आहे. भारतीय पर्यटन व्यवसायात इतिहासाला अनन्यसाधारण महत्व आहे. पर्यटनात इतिहासाचे उपयोजन म्हणजे ऐतिहासिक स्थळे, वारसा, संस्कृती आणि कला यांचा पर्यटकांना अनुभव देण्यासाठी वापर करणे होय. यामध्ये किल्ले, मंदिरे व प्राचीन वास्तूंचे जतन मार्गदर्शक म्हणून इतिहासाचा वापर ऐतिहासिक वारसा स्थळांचे जतन संवर्धन आणि पर्यटकांना त्यांच्या संस्कृतीबद्दल माहिती देणे याचा समावेश होतो.

**शोध निबंधाची उद्दिष्टे**

1. पर्यटन विकासात ऐतिहासिक महत्व अभ्यासणे
2. ऐतिहासिक वारसा स्थानाचे जतन व संवर्धन यावर प्रकाश टाकणे
3. ऐतिहासिक पर्यटनातून मिळणाऱ्या व्यवसायाच्या संधीचा अभ्यास करणे
4. ऐतिहासिक संशोधनाला चालना मिळेल यावर प्रकाश टाकणे

**पर्यटन म्हणजे काय?**

मानवाने विविध ठिकाणी केलेला हेतुपूर्वक प्रवास व वास्तव्य याला पर्यटन असे सर्वसाधारण म्हटले जाते. पर्यटन (Tourism) ही संज्ञा प्रवास (Tour) या शब्दांशी संबंधित आहे. Tour हा शब्द लँटीन भाषेतील Tournus या शब्दापासून आलेला आहे. Tournus या शब्दाचा अर्थ वर्तुळ (Circle) असा आहे. या शब्दापासून पुढे वर्तुळाकार प्रवास ही संकल्पना सुरु झाली. Tournus या शब्दाचे रुपांतर नंतर Tourn मध्ये झाले. Tourn या शब्दाचा अर्थ Journey म्हणजे प्रवास किवा भ्रमंती असा होतो.

पर्यटन हा आधुनिक काळातील शब्द तेराव्या शतकात प्रचलित झाला असावा. याचा अर्थ एका ठिकाणहून दुसऱ्या ठिकाणी प्रवास करणे आणि मूळ ठिकाणी ठराविक काळात परत येणे असा होतो किंवा पर्यटन म्हणजे माणसाने त्याच्या नेहमीच्या राहत्या ठिकाणापासून इतरत्र केलेले अल्पकालीन स्थलांतर होय किंवा दूरवरच्या स्थळांना विशिष्ट हेतूने भेट देण्यासाठी प्रवास करणे म्हणजे पर्यटन होय. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात थॉमस कुकने ६०० लोकांची लिस्टर ते लाफबरो अशी रेल्वे सहल आयोजित केली होती. कुकने पर्यटक तिकिटे विकासाचा एजन्सी व्यवसाय सुरु केला होता. या प्रयत्नातूनच आधुनिक पर्यटन युग सुरु झाले.

भारतात पूर्वी पासूनचं तीर्थयात्रेसाठी एका टोकापासून ते दुसऱ्या टोकापर्यंत प्रवास करण्याची परंपरा होती. महाराष्ट्रातून उत्तरेकडे व् तेथून पुन्हा महाराष्ट्रपर्यंत प्रवास वर्णन विष्णू भट्ट गोडसे यांनी आपल्या ‘माझा प्रवास’ या प्रवास वर्णनाच्या पुस्तकात लिहून ठेवले आहे. हा प्रवास त्यांनी सन १८५७ च्या स्वातंत्र्य संग्रामाच्या काळात केला होता. त्यामुळे ते घडणाऱ्या घटनांचे प्रत्यक्ष साक्षीदार आहेत. राणी लक्ष्मीबाई यांच्या जीवनाविषयीचे अनेक तपशील १८ व्या शतकातील मराठी भाषेचे स्वरूप इ. माहिती मिळते.

देशाला प्राचीन, मध्ययुगीन आणि अर्वाचीन अशा ऐतिहासिक स्थळांचा वारसा मिळाला आहे. त्याच बरोबर समृध्द नैसर्गिक वारसा लाभला आहे. संपूर्ण जगात गौरवली गेलेली काही महत्वाची स्थळे भारतात आहेत. उदा. ताजमहाल, जंतर-मंतर महाराष्ट्रातील अजिंठा, वेरूळ घारापुर (एलिफंटा लेणी) छ. शिवाजी महाराज, रेल्वे स्थानक, पश्चिम घाटातील कास पठार इ.

**पर्यटन विकासाचे ऐतिहासिक पार्श्वभूमी**

प्राचीन काळापासून मानवाला आपल्या उपजीविकेसाठी एका ठिकाण वरून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर करावे लागत असल्याने त्याच्यात प्रवासाची आवड होती व आजही आहे. प्राचीन काळी बहुतांश प्रवाशी यात्रेकरू नव-नवीन प्रदेशाचा अभ्यास करण्यासाठी प्रवास करीत असत. पुढे व्यापाराच्या उद्देशाने जगातील दूर-दूरच्या देशात प्रवास करण्याला गती प्राप्त झाली. मानवी संस्कृतीचा विकास झाल्यानंतर जगातील प्रदेशांचा शोध घेण्यासाठी व् जग पाहण्यासाठी जाणीव पूर्वक प्रवास होऊ लागला. रोमन साम्राजांच्या कालावधीत जगातील प्रवासाचे स्वरूप बदलले. प्रवास हा मनोरंजनासाठी , आनंद मिळवण्यासाठी लोक प्रवास करू लागले. संपूर्ण जगात ऐतिहासिक पर्यटनाला महत्वपूर्ण स्थान आहे. लोकांचे इतिहासाच्या संदर्भातील कुतूहल लक्षात घेऊन ऐतिहासिक पर्यटन सहलीचे आयोजन केले जाऊ लागले. बौध्द वाङ:मयात लोकांच्या उद्बोधनासाठी स्वतः गौतम बुद्धानी भारतातील अनेक शहरांना भेटी दिल्याचे उल्लेख आहेत. इ. सं. ६३० मध्ये चीनी प्रवासी युआन श्वांग चीन मधून भारतात आला होता. तो ज्ञानाचा भुकेला होता. भारतात सर्वत्र प्रवास केला होता. जगातील पहिला युरोपीय शोधक म्हणून बेंजामिन डयूडेला प्रसिध्द आहे. इ. सं. ११५९-११७३ दरम्यान त्याने इटली, फ्रांस, जर्मनी, ग्रीस, सिरीया, अरबस्थान, इजिप्त, इराक, पर्शिया, भारत, चीन या देशांना भेटी दिल्या होत्या.इटालीन प्रवासी मार्कोपोलो याने आशिया खंड आणि विशेषत: चीन ची ओळख त्यांनी युरोपला करून दिली. इब्न बतुता हा १४ व्या शतकातील प्रवासी होय. तो ३० वर्षे जग फिरत होता मध्ययुगाचा इतिहास व समाज जीवन समजण्यास त्याचे प्रवास वर्णन महत्वाचे आहे. भारतातील संत नामदेव, संत एकनाथ, नानकदेव, रामदास स्वामी यांना आपले तत्वज्ञान समजावून सांगण्यासाठी प्रवास करावा लागत होता. महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांची संबंधीत असणाऱ्या किल्ल्यांवर दुर्ग अभ्यासक गो. नी. दांडेकर दुर्ग भ्रमण यात्रा आयोजित करत असत.

**वारसा स्थळे आणि पर्यटन**

वारसा स्थळे म्हणजे भूतकाळातील ऐतिहासिक, सांस्कृतिक नैसर्गिक वारसा स्थळांना भेटी देणे. सांस्कृतिक वारसा ( किल्ले, मंदिरे, स्मारके ) नैसर्गिक वारसा ( नॅशनल पार्क, टेकड्या ) भारतातील सुमारे ४० हून अधिक जागतिक वारसा स्थळे आहेत. ही स्थळे पाहण्यासाठी पर्यटक विविध स्थळांना भेटी देतात. त्यामुळे स्थानिक रोजगाराला चालना मिळते. सांस्कृतिक देवाण-घेवाण होते त्याच बरोबर इतिहासाबद्दल जागरूकता निर्माण होते. वारसा स्थळ म्हणून पात्र ठरलेल्या ठिकाणी भेट देऊन त्याचे ऐतिहासक महत्व जाणून घेण्या बरोबरच त्या स्थळाचे जतन आणि संरक्षण करण्यासाठी आपण पुढाकार घेतला पाहिजे. आपल्या जवळच्या ऐतिहासिक आणि वास्तुकलेच्या दृष्टीने महत्वाच्या इमारती स्मारकांविषयी जागरूकता निर्माण केली पाहिजे.

**पर्यटन आणि वस्तूसंग्रहालये**

वस्तुसंग्रहालयाचे सर्वात महत्वाचे कार्य म्हणजे प्राचीन संस्कृतिचे जतन करणे होय. प्राचीन वस्तू गोळा करणे, त्याचे जतन करणे, त्याचे प्रदर्शन करणे हे वस्तुसंग्रहालयाचे महत्वाचे कार्य आहे. त्यातून समाजाच्या सांस्कृतिक प्रगतीचा आढावा घेता येतो. वस्तू संग्रहालये ही राष्ट्राच्या वैभवाची प्रतीके आहेत. वस्तू संग्रहालये ही भावी पिढीला मार्गदर्शन करतात. गतकालीन राष्ट्राच्या वैभवाची माहिती वस्तुसंग्रहालयामार्फत मिळते. ही सर्व वस्तुसंग्रहालये शैक्षणिक पर्यटनाची महत्वाची केंद्रे आहेत त्यामुळे इतिहासामुळे पर्यटनाची व्याप्ती वाढते.

**किल्ले, राजधान्य आणि युद्धभूमी**

आपल्या देशाला विविध राज्यांमध्ये विशेषतः महाराष्ट्राला ऐतिहासिक वारसा सांगणाऱ्या गड किल्ल्यांची मोठी परंपरा लाभली आहे. महारष्ट्रातील सुमारे ३६० किल्ल्या पैकी ४४ किल्ले राष्ट्रीय संरक्षित स्मारके व् ४६ किल्ले राज्य संरक्षित किल्ले म्हणून घोषित झालेले आहेत. प्राचीन काळापासून महाराष्ट्रात विविध राजवटीत किल्ल्यांची बांधकामे झालेली आहेत. सात वाहन वाकाटक, चालुक्य, यादव,मुघल, आदिलशहा, मराठे, इंग्रज, पोर्तुगीज इत्यादीत राजवटीत किल्ले बांधले. शिव काळात या किल्ल्या भोवती इतिहास घडला आहे. प्रत्येक किल्ला इतिहासाचा साक्षीदारच आहे.

जागतिक प्रसिद्ध पर्यटन स्थळांमध्ये त्या काळातील ऐतिहसिक राजधान्यांचा समावेश होतो. बऱ्याच राजधान्यांची स्थाने शक्यतो किल्ल्यांची होती अशा राजधान्या आज भग्न अवस्थेत पहावयास मिळतात उदा. हंप्पी, बदामी, हैद्राबाद,औरंगाबाद निर्णायक, अहमदनगर,पुणे,कोल्हापूर म्हैसूर इ. तसेच ज्या ठिकाणी काही युद्धे झाली अशी ठिकाणे आज पर्यटनाची केंद्रे बनली आहेत उदा. कुरुक्षेत्र, पानिपत, हळदीघाट, तालीकोट,प्रतापगड युद्ध इ.

**ऐतिहासिक स्मारके**

युद्धात ज्यांना वीर मरण आले त्यांची स्मारके तसेच,समाधी स्थळांना ऐतिहासिक स्मारके म्हणून महत्व आहे. बौद्ध स्मारके, हिंदू स्मारके, मुस्लीम स्मारके,ब्रिटिश कालीन स्मारके.इ.

पर्यटन व्यवसायाच्या वाढमध्ये इतिहासाचा अत्यंत महत्वाचा वाटा आहे. ऐतिहासिक स्थळे, मंदिरे आणि वारसा स्थळांविषयी माहिती पर्यटकांपर्यंत पोहचवून इतिहास पर्यटनाला चालना देतो. त्यामुळे रोजगार निर्मिती होते आणि स्थानिक हस्तकला व् पर्यटन व्यवसाय बळकट करतो.

पर्यटनामध्ये इतिहासाचे उपयोजन

1. **ऐतिहासिक स्थळांचे जतन व् संवर्धन** –

पर्यटनामुळे ऐतिहासिक वास्तूंचे (किल्ले, लेणी, स्मारके) जतन करण्याचे महत्व वाढते. त्यातून मिळणाऱ्या उत्पनाचा काही भाग वास्तूंच्या डागडूजीसाठी, शुशोभिकरणासाठी वापरला जातो.पर्यटकांनीही ऐतिहासिक वारसा स्थळांचे जतन आणि संवर्धन करण्याची आपलीही जबाबदारी असल्याची जाणीव ठेवणे गरजेचे आहे.

२) **स्थानिक इतिहास आणि संस्कृतीचा प्रसार –**

आपल्या परिसरातील वारसा परंपरा आणि जीवन शैलीचे जतन करून भावी पिढी पर्यंत पोचविणे गरजेचेआहे. गावात असलेल्या ऐतिहासिक ठिकाणांना भेट देण्यासाठी स्थानिक लोकांसाठी व पर्यटकांसाठी सहलीचे आयोजन करता येते. शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची जवळच असणाऱ्या गड-किल्ल्यांची सफर आयोजित करता येते. स्थानिक इतिहास समजावून घेण्यासाठी त्यांच्या गावचा किंवा परिसराचा इतिहास लिहिण्यासाठी प्रकल्प देता येतात. त्यामध्ये गावातील जुन्या जाणत्या व्यक्तींच्या मुलाखती घेणे व् हस्तलिखिते गोळा करणे इ. समावेश असू शकतो. जुनी नाणी, भांडी, छायाचित्रे, शेतीची अवजारे यांचे प्रदर्शन भरवून स्थानिक इतिहासाबद्दल समाजात आवड निर्माण करता येते. आपल्या संस्कृतीचा भाग असलेले सण-समारंभ, पारंपारिक खेळ यावर आधारित खाद्य महोत्सवांचे आयोजन करता येते.यातून पर्यटन व्यवसायाला चालना मिळू शकते.

**पर्यटक मार्गदर्शक**

वेगवेगळ्या ऐतिहासिक स्थळांची सखोल माहिती असणाऱ्या स्थानिक मार्गदर्शकाकडून पर्यटकांना त्या स्थळांविषयी पर्यटकांना माहिती मिळते. मार्गदर्शक हे एखाद्या स्थळाचा इतिहास व त्याचे महत्व सोप्या भाषेत समजावून सांगणारे तज्ञ असतात. स्थानिक भाषा आणि संस्कृतीची माहिती पर्यटकांना नसल्याने मार्गदर्शक, भाषांतरकार म्हणून मदत करतात. पर्यटकांच्या आवडीनुसार स्थानिक खाद्य पदार्थ आणि खरेदीसाठी मदत करतात. यां ऐतिहासिक पर्यटनामुळे स्थानिक रोजगाराला चालना मिळते.

**ऐतिहासिक वारसा हॉटेल**

पूर्वीच्या काळी राजवाडे, किल्ले किंवा ऐतिहासिक वास्तू म्हणून बांधलेल्या इमारती आज त्याचा अतिथीच्या राहण्यासाठी अलिशान हॉटेल म्हणून उपयोग केला जात आहे. यामध्ये वास्तव्य केल्याने पर्यटकांना राजेशाही अनुभव आणि जुन्या संस्कृतीचा आनंद घेता येतो. उदा. उमेद भवन पॅलेस ( जोधपूर, राजस्थान) किंवा मुंबई मधील १९०३ मध्ये बांधलेले ताजमहाल पॅलेस इ.

**पर्यटन आणि ऐतिहासिक संशोधन**

इतिहासाचे पर्यटन हे केवळ मनोरंजनासाठी नसून त्याद्वारे इतिहासाचे जतन, सांस्कृतिक वारशाची देवाण घेवाण, राष्ट्रीय अस्मितेसाठी महत्वाची आहे. पर्यटनामुळे प्रत्यक्ष ऐतिहासिक स्थळांना भेटी दिल्यामुळे त्या स्थळांचे संवर्धन होण्यास मदत होते. त्याच बरोबर आर्थिक अर्थव्यवस्थेलाही चालना मिळण्यास मदत होते. इतिहासाचा अभ्यास करण्यास मदत होते. ऐतिहासिक स्थळांना भेटी दिल्यामुळे विद्यार्थ्यांना भूतकाळातील तंत्रज्ञान,संस्कृती,जीवनशैली इ. संशोधन करण्यास मदत होते. भारतासारख्या समृध्द वारसा लाभलेल्या देशाला पर्यटन आणि ऐतिहासिक पर्यटन आणि संशोधन हे रोजगाराचे प्रमुख साधन म्हणून विकसित होत आहे. ऐतिहासिक पर्यटन स्थळे आणि रोजगाराच्या संधी यातून स्थानिक आणि धार्मिक स्थळांचे महत्व अधोरेखित होते. एखाद्या ऐतिहासिक पर्यटन स्थळावर केलेले संशोधन हे अभ्यासक, संशोधक,विद्यार्थी यांना उपयुक्त ठरते.

त्याचबरोबर ऐतिहासिक पर्यटन स्थळांची माहिती अनेक लोकांना पुस्तक स्वरुपात मिळण्यास मदत होते. प्रकाशक, मुद्रक,लेखक अशा विविध घटकांना रोजगाराचे साधन उपलब्ध होण्यास मदत मिळते.

**समारोप**

ऐतिहासिक पर्यटनामध्ये ऐतिहासिक स्थळे, स्मारके, किल्ले इ. ठिकाणांना भेट देणे यांचा समावेश होतो. युध्दभूमी, पूर्वीचे तुरुंग, चैत्य, लेणी, राजवाडे इ. इतिहासाबद्दल जाणून घेणे आणि भूतकाळाचा आदर करणे हा हेतू असतो. ऐतिहासिक पर्यटनामध्ये पर्यटकांना ऐतिहासिक स्थळे, स्मारके, वस्तू, वारसा स्थळांना भेटी देऊन मानवी इतिहासाच्या समृद्ध तपशिलाचा शोध घेण्याची संधी उपलब्ध करून देतो. विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या शैक्षणिक सहलीतून त्यांच्यात इतिहासाबद्दल कुतूहल आणि जिज्ञासा निर्माण होऊन इतिहास लेखनाला चालना मिळते.

ऐतिहासिक संग्रहालये, हस्त- कौशल्य निर्मित वस्तू, पुरातत्वीय अवशेष यामुळे पर्यटकांना गतकालीन जीवन, चालीरीती,वेशभूषा, केशभूषा इ. माहिती मिळते. तसेच मौखिक इतिहास स्थानि आख्यायीकांच्या दस्तऐवजी करणास चालना मिळते.भारतीय पर्यटनाचा इतिहास हजारो वर्षे जुना आहे.आजही फार मोठी भारतीय बाजार पेठ पर्यटकांसाठी उपलब्ध आहे.ऐतिहासिक स्थळे, राष्ट्रीय महापुरुषांची निवास स्थाने, अतिप्राचीन मंदिरे, राजस्थान व महाराष्ट्रातील किल्ले, आकर्षक महाल आणि हवेल्या,ताजमहाल,कुतुबमिनार इ.शेकडो स्थळे पर्यटकांचे लक्ष वेधत आहेत.यावरून पर्यटनात इतिहासाचे महत्व अनन्यसाधारण असल्याचे स्पष्ट होते.पर्यटनामुळे देशाच्या आर्थिक विकासाला चालना मिळते, ज्ञानाची क्षितिजे विस्तृत होण्यास मदत होते.सांस्कृतिक देवाण-घेवाण,सांस्कृतिक वारशाचे जतन,आंतरराष्ट्रीय संबंध सुधारण्यास चालना मिळते असे अनेक फायदे असले तरी सांस्कृतिक,ऐतिहासिक स्थळांचे पावित्र्य राखणेही तितकेच महत्वाचे आहे. पर्यटनामुळे पर्यावरणाचे नुकसान होणार नाही तसेच सांस्कृतिक संघर्ष उद्भवणार नाही याची काळजी घेतली पाहिजे सामाजिक सलोखा राखणे ही सर्वांचीच जबाबदारी आहे.

**संदर्भ**

१)डॉ. चव्हाण प्रमोद,उदयोन्मुख प्रवाह पर्यटन,संकल्प प्रकाशन लातूर २०१७
२)डॉ.ढेरे अ. रा.,भारतीय संस्कृतीचा प्रवास, राजहंस प्रकाशन, पुणे,२००५
३) डॉ.गाठळ, इतिहासाची शाखा: पर्यटनशास्त्र
४) कठारे अनिल व डॉ.पवार शिवाजी,भारतीय कलेचा इतिहास,नांदेड,कल्पना प्रकाशन, डिसेंबर २००८
५) डॉ.घारपुरे विठ्ठल,पर्यटन भूगोल,पिंपळापुरे ॲंड कंपनी पब्लिशर्स,नागपूर २०१०
६)छिल्लर सुशीलकुमार,भारतीय पर्यटन विकास व संभाव्यता,राहुल पुब्लीशिंग हाउस शास्त्री नगर,मेरठ २०१३
७) किर्लोस्कर पर्यटन विशेषांक, मार्च १९९७